'युनिक फीचर्स'चं मासिक

www.eanubhav.com

मार्च २०१०

३० रुपये

# महा अनुभव

## थेंबे थेंबे समृद्धी !



जागतिक जल दिन - २२ मार्च

पाण्याचं दुर्भिक्ष्य
हा महाराष्ट्राच्या प्रगतीमधला मोठा अडसर आहे.
पाण्याच्या अभावाने इथल्या साऱ्या जगण्याचीच वणवण झाली आहे.
इथल्या गरिबीची मुळंही यामध्ये आहेत.

पण हे चित्र बदलू शकतं !

लोकशक्ती संघटित झाली, पावसाचा प्रत्येक थेंब अडवण्यासाठी आणि मुरवण्यासाठी
सज्ज झाली तर गावांचा कायापालट घडतो. थेंबाथेंबाने समृद्धी ठिबकू लागते.

महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातली अनेक गावं आज स्व-प्रयत्नांमधून हे दाखवून देत आहेत.

'हरिश्चंद्राची फॅक्टरी'ने चर्चेत असलेले **परेश मोकाशी** सांगताहेत आपल्या निर्मितीविषयी...



महाराष्ट्राला शिक्षणाचा वेगळा 'पॅटर्न' देणाऱ्या लातूरच्या लोकजीवनाविषयी **'महाराष्ट्र दर्शन'**मध्ये....

भारतीय उपखंडातील लोकशाहीवर अभ्यासाद्वारे प्रकाशझोत टाकणाऱ्या **'लोकशाही ज़िंदाबाद'** या पुस्तकातील भाग...

**डॉ.आनंद नाडकर्णींचं** 'अध्यात्म' त्यांच्याच शब्दात...



८-१० महिन्यांपूर्वी आम्ही अवर्षणप्रवण क्षेत्रातल्या काही भागांचा दौरा केला होता. अनेक लहान-मोठ्या गावांमधली प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली होती. पाण्याच्या अभावाचं विदारक चित्र समोर आलं होतं. पाण्याच्या अभावामुळे इथल्या शेती-उद्योग-रोजगार-शिक्षण-आरोग्य-सामाजिक स्वास्थ्य या साऱ्याचीच दैना झाल्याचं दिसलं. 'अनुभव'च्या दिवाळी अंकातील 'अजूनही कोरडेच आड...' या शोधलेखात हे विदारक वास्तव आम्ही तपशिलाने मांडलं होतं. इथल्या कोट्यवधी जनतेला केवळ निसर्गाच्याच भरवशावर सोडून दिलं आहे काय, त्यांचा कोणीच वाली नाही का, हा प्रश्न आम्हाला अस्वस्थ करून गेला. या अस्वस्थतेतून आम्ही पुढचा शोध सुरू केला. या शोधात आम्हाला काही आशेचे किरण दिसले. कुठे लोक स्वयंस्फूर्तीने पुढे येत आहेत, कुठे कर्तव्यतत्पर शासकीय अधिकारी आपल्या कार्यक्षेत्राचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी झटत आहेत, कुठे गावकरी सेवाभावी संस्थांच्या मदतीने पाण्याच्या समस्येवर मात करण्याचे धडे गिरवत आहेत, त्यासाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा आधार घेत आहेत. आपल्या घरात, आपल्या गावात सुख यावं, समृद्धी यावी यासाठी पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवण्याच्या धडपडीची अशी उदाहरणं विरळा असली तरी ती दिलासादायक आहेत, इतरांना प्रेरणा देणारी आहेत. म्हणूनच अशा प्रयत्नांवर इथे प्रकाश टाकत आहोत.

गेल्या तीस-चाळीस वर्षांत विहिरी-विंधनविहिरींची संख्या वाढली, उपसा साधनं-तंत्रज्ञान विकसित झालं, अधिक पाणी शोषणाऱ्या पिकांचं प्रमाण वाढलं, वाढत्या लोकसंख्येबरोबर पाण्याची मागणी वाढली. या साऱ्याचा परिणाम भूजलाच्या उपशावर, पर्यायाने भूजलाची पातळी अधिक खाली जाण्यावर झाला. उपशाच्या प्रमाणात भूजलाचं पुनर्भरण होत नसल्याने भूजलाचा समतोल बिघडला. महाराष्ट्रातल्या आणि विशेषत: अवर्षणप्रवण क्षेत्रातल्या पाण्याच्या दुर्भिक्षाचं हे एक प्रमुख कारण आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाचं जास्तीत जास्त पाणी अडवणं, ते जमिनीत मुरवणं, पाण्याचा जास्तीत जास्त काटेकोर व नियोजनपूर्वक वापर करणं, अशा प्रयत्नांमधून भूजलाची पातळी वाढवता येऊ शकते व पाण्याचं दुर्भिक्ष कमी करता येतं. याच धारणेतून महाराष्ट्रात जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्रविकासाच्या कामांना चालना मिळालेली दिसते.

सुमारे तीसेक वर्षांपूर्वी अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीमध्ये राबवलेल्या पावसाचा थेंब न् थेंब अडवून जमिनीत जिरवण्याच्या प्रयोगाने महाराष्ट्रात आदर्श निर्माण केला. हिवरेबाजारच्या पोपटराव पवारांनी अण्णांचा आदर्श घेऊन केलेलं कामही आदर्श ठरलं. आज महाराष्ट्राच्या अनेक गावांमध्ये सुरू असलेल्या जलसंधारणाच्या कामांसाठी हे प्रयोग प्रेरक ठरले आहेत. 'पाणी अडवा, पाणी जिरवा', 'माथा ते पायथा', 'कुऱ्हाडबंदी, चराईबंदी' या 'मंत्रां'चं महत्त्व या प्रयोगांनी सिद्ध केलं. वाहून जाणारं पाणी आणि माती वाचवण्यासाठी ओढ्याच्या पात्रावर चेक डॅम, नालाबंड बांधणं, पाझर तलाव बांधणं, उताराच्या जमिनीवर चर घेऊन पाणी अडवणं, असे पाणी अडवण्याचे व जिरवण्याचे मार्ग या प्रयोगांनी इतर गावांना दिले आहेत. टेकड्यांच्या-डोंगरांच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत सलग समतल चर खोदल्यामुळे माथ्यावर पडणारा पाऊस वाहून न जाता जमिनीत झिरपतो व पायथ्याच्या विहिरींना पाणी मिळतं, हे सूत्र आता काही गावं राबवत आहेत. वसंतराव टाकळकर हे वनाधिकारी असताना त्यांनी या सूत्राचा यशस्वी अवलंब केला होता. वनराई बंधारे,



**पाण्याचं दुर्भिक्ष हा महाराष्ट्राच्या प्रगतीमधला मोठा अडसर आहे. पाण्याच्या अभावामुळे महाराष्ट्रातल्या, विशेषत: कायमस्वरूपी अवर्षणग्रस्त भागातल्या शेती, उद्योग, रोजगार, शिक्षण, आरोग्य व सामाजिक स्वास्थ्याची कशी दैना झाली आहे याचं विदारक चित्र 'अनुभव'च्या दिवाळी अंकातील 'अजून कोरडेच आड...' या शोधलेखात आम्ही मांडलं होतं. लोकांना केवळ निसर्गाच्या भरवशावरच सोडून द्यायचं का, असा अस्वस्थ करणारा प्रश्न आम्हाला पडला. या प्रश्नाचं उत्तर शोधताना काही आशेचे किरण दिसले. लोकशक्ती संघटित झाली, पावसाचा प्रत्येक थेंब अडवण्यासाठी सज्ज झाली तर गावांचा कायापालट घडतो, थेंबाथेंबाने समृद्धी ठिबकू लागते, असा विश्वास देणारे प्रयोग आज अनेक गावांमध्ये होत आहेत. अशा प्रयोगांवर-प्रयत्नांवर हा प्रकाशझोत.**

गॅबियन बंधारे, शेतामध्ये शेततळी बांधणं, नदीला मिळणाऱ्या लहान-मोठ्या ओढ्यांची रुंदी व खोली वाढवणं, असेही काही उपयुक्त मार्ग महाराष्ट्रातल्या काही यशस्वी प्रयोगांमधून पुढे आले आहेत. महाराष्ट्रातली अनेक प्रयोगशील गावं आज या प्रयोगांचं अनुकरण करत आहेत. आपल्या गावाची भौगोलिक जडणघडण, पाण्याची उपलब्धता आणि गरज लक्षात घेऊन पाण्याचं दुर्भिक्ष संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवून समृद्धीचा मार्ग मोकळा करत आहेत.

◆

सुपे-बारामती हा परिसर अवर्षणप्रवण क्षेत्रात मोडतो. बोरकरवाडी हे सुप्यापासून सुमारे सात कि.मी. अंतरावर असलेलं गाव एके काळी कांद्याचं आगार म्हणून ओळखलं जात होतं. पण अलीकडच्या काळात इथलं कांद्याचं पीक कमी झालं याचं कारण पाण्याची टंचाई. १९७२च्या दुष्काळाच्या आधी काही वर्षांपूर्वी म्हणजे १९६८ साली बोरकरवाडीच्या वरच्या भागात तलावाचं काम सुरू झालं होतं. या तलावाने बोरकरवाडीला अनेक वर्षं साथ दिली. १९७२च्या दुष्काळानंतर हा तलाव फार फार तर दोन-तीन वेळा पूर्ण भरला असेल, तरीही पिण्यासाठी आणि शेतीसाठी पुरेसं पाणी उपलब्ध होतं. कारण उपसा कमी होता. पण पुढे १९८२ मध्ये गावात वीज आली. विहिरींची संख्या वाढली. लोक विहिरीच्या पाण्यावर उसाचं पीक घेऊ लागले. उपसा वाढला. भूजलाची पातळी खालावली. तलावही गाळाने भरला. पिण्याच्या पाण्यासाठी गावावर टँकर मागवण्याची वेळ आली तेव्हा कुठे गावाला जाग आली. पाणी अडवणं हेच सर्वांच्या हिताचं आहे, हे ओळखून गावातले लोक एकत्र आले.

बोरकरवाडीत सुमारे एकशे ऐंशी कुटुंब. त्यात एकशे पस्तीस घर बोरकरांची. बोरकरांमध्ये दोन गट पडल्याने गाव विभागलं गेलं होतं. एकमेकांचे पाय खेचण्याने गावाचा विकास खुंटला होता. राजेंद्र बोरकर व गावातल्या इतर तरुणांच्या प्रयत्नांमुळे दोन गट एकत्र झाले. याच तरुणांनी गावाच्या विकासात पुढाकार घेतला. त्यांनी राळेगणसिद्धी, हिवरेबाजार, जालना जिल्ह्यातलं कडवंची अशा आदर्श गावांची पाहणी केली आणि तिथलं काम समजून घेतलं.

राजेंद्र बोरकरांनी पहिला प्रयोग आपल्या शेतात केला. प्रथम त्यांनी संपूर्ण जमीन समतल करून घेतली. जमिनीत चर खणून पाणी अडवलं. ते जमिनीत मुरल्यानंतर फरक दिसून आला. त्यांच्या स्वतःच्या व शेजाऱ्यांच्या विहिरीची पाणीपातळी वाढली व जास्त दिवस टिकलीसुद्धा. शेतातलं पाणी शेतात अडवलं तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, असा विश्वास गावकऱ्यांमध्ये निर्माण झाला. 'शिवारातील बांधबंदिस्ती करून पाण्याचा एक थेंबही शिवाराबाहेर जाऊ देणार नाही' अशी प्रतिज्ञा गावकऱ्यांनी केली. शेतकऱ्यांनी आपापल्या शेतांची बांधबंदिस्ती केली, तीही कोणत्याही भांडण-तंट्याशिवाय! गावाने विहीर पुनर्भरणाचा कार्यक्रम हाती घेतला. गावातल्या मंदिराला लागून असलेल्या चिंध्यादेव ओढ्याचं तसंच तलाव ओढ्याचं पात्र जर रुंद व खोल बनवलं आणि चिंध्यादेव ओढ्याचं गावाबाहेर वाहून जाणारं पाणी तलाव ओढ्याकडे वळवून आणलं तर गावातल्या विहिरींना त्याचा फायदा मिळू शकतो, अशी कल्पना पुढे आली. गावकऱ्यांनी घरपट्टी व पाणीपट्टीच्या माध्यमातून एक लाख रुपये आणि लोकवर्गणीतून सहा लाख रुपये गोळा करून या कामाला सुरुवात केली. हा प्रयोग यशस्वी होऊन सहाशे ऐंशी हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आलं. दोन ओढे एकत्र जोडण्याच्या या प्रयोगाला



# थेंबे थेंबे समृद्धी...

मनोहर सोनवणे
संतोष गवळे

इथल्या लोकांनी नाव दिलंय 'नदीजोड प्रकल्प'! यामध्ये चिंध्यादेव ओढा व तलाव ओढ्यावर सिमेंटचे सहा बंधारे बांधण्यात आले. त्यामुळे ओढ्यांचं पाणी अडवलं गेलं. तसंच शेताला केलेल्या बांधबंदिस्तीमुळे शेतातलं पाणी शेतातच मुरलं. साहजिकच गावातली भूजलाची पातळी वाढली, विहिरींना पाणी मिळालं. गावाच्या खालच्या बाजूस राजेंद्र बोरकरांची ७५ फूट खोल विहीर आहे. शांताराम या ग्रामस्थाच्या मते त्याने या विहिरीला कधीच पाणी पाहिलं नव्हतं. मात्र आता एकच पाऊस झाला तरीही विहिरीत सुमारे पंधरा ते वीस फूट खोल पाणी असतं.

शिवाजी माने या गावाचे सरपंच आहेत. गावात पिण्याच्या पाण्यासाठी विहीर खोदली असल्याचं त्यांनी सांगितलं. नळयोजनेद्वारे गावातल्या प्रत्येकाच्या दारात नळ देण्यात आला आहे. आता या गावात घरांच्या छतावर पडणारं पावसाचं पाणी एकत्र करून ते साठवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असं त्यांनी सांगितलं. पावसाच्या प्रत्येक थेंबाचा पुरेपूर वापर करणं म्हणजेच रेन वॉटर हार्वेस्टिंग. राजेंद्र बोरकर पावसाच्या पाण्याला 'आईचं दूध' म्हणतात. 'लहान मुलाला जसं आईचं दूध पोषक असतं, तसंच शेताला पावसाचं पाणी पोषक असतं. आपल्या जमिनी सुपीक करायच्या असतील तर आपण पावसाचं पाणी जमिनीत मुरू द्यावं व ते वापरावं,' असं त्यांचं म्हणणं.

बोरकरवाडीत पाणी अडवण्याचा व जिरवण्याचा प्रयोग घडला तो लोकांच्या एकत्र येण्यातून. लोकसहभागातून अवघ्या चौदा-पंधरा महिन्यांच्या काळात या गावाने पाण्याच्या दुर्भिक्षावर कायमचा इलाज शोधला. गावकऱ्यांच्या प्रयत्नांना कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची आणि शासकीय योजनांची साथ मिळाली.

◆

लोकांच्या एकीचं आणखी एक उदाहरण यवतमाळ जिल्ह्यातल्या उमरखेड तालुक्यातल्या बिटरगाव बुद्रुक या गावात व परिसरात आढळून आलं.

२००० साली या गावापासून तीन-चार कि.मी. अंतरावरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीच्या पात्रावरील टाकळी बंधाऱ्याचं काम पूर्ण झालं. १९९७ साली या बंधाऱ्याला मंजुरी मिळाली होती. हा बंधारा आसपासच्या टाकळी, धानोरा, कोठा तांडा, कोठा, बिटरगाव बुद्रुक, भोजनगर तांडा, रतन नाईक तांडा, सावळेश्वर, करंजी, टाणकी या वस्त्यांकरता वरदान ठरला. पिण्याच्या पाण्याची, शेतीच्या सिंचनाची सोय झाली. या बंधाऱ्याच्या आधी या परिसरात सिंचनाची सोय नव्हती. पावसाळ्यात शेतातली पिकं पुराने वाहून जात असत. शेतकऱ्यांवर दुबार-तिबार पेरणी करण्याची वेळ येत असे. रब्बी हंगामासाठी तर पाण्याची वानवाच असे. गावकऱ्यांना आपली गुरं मोकाट सोडून द्यावी लागत. इथल्या बंजारा लोकांच्या तांड्यांमध्ये तर पावसाळ्याच्या चार महिन्यांनंतर रोजीरोटीसाठी हंगामी स्थलांतर अटळच असायचं. बंजारा लोकांच्या वस्तीला तांडा म्हणतात. तांड्यातले तरुण ऊसतोडणीच्या कामासाठी बाहेर जायचे. तांड्यात उरायची ती म्हातारी, वयस्कर माणसं, बायका आणि लहान मुलं. बंधाऱ्यामुळे हे चित्रं बदललं.

या बंधाऱ्याची लांबी १३७ मीटर व उंची ४.५ मीटर. या बंधाऱ्यात ३६७ दरवाजे बसवले तर ३४५७ द.ल.घ.मी. पाणी नदीच्या पात्रात साठतं. नदीच्या दोन्ही बाजूंच्या २१ किलोमीटर परिसराच्या शेतीचा प्रश्न सुटतो. सरकारने तीन कोटी रुपये खर्च करून हा बंधारा बांधला; पण त्याच्या व्यवस्थापनामधल्या ढिसाळपणाने आपले रंग दाखवायला सुरुवात केली. सुरुवातीचा काही काळ बंधाऱ्याचं व्यवस्थापन ठीक झालं. नियमितपणे दरवाजे टाकून पाणी अडवलं गेलं. पण नंतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा निष्काळजीपणा आणि कामचुकार वृत्तीचा अनुभव या परिसरातल्या गावकऱ्यांना येऊ लागला. पाणी अडवण्यात त्यांनी केलेल्या हलगर्जीपणामुळे काही शेतकऱ्यांची पिकं जळून गेली. पाण्याच्या अभावाचा फटका संत्र्यांच्या बागांना, केशर आंब्याच्या झाडांना बसला. दरवाजे बसवण्यासाठी मजूर मिळत नाहीत, दरवाज्यांसाठी लागणारे वायसर उपलब्ध होत नाहीत, अशी अनेक कारणं शासकीय अधिकारी पुढे करत होते.

शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहणं काही खरं नाही, या जाणिवेतून या भागातल्या काही तरुणांनी परिसरातल्या शेतकऱ्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यात त्यांना यश मिळालं. सर्वांनी एकत्र येऊन बंधाऱ्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. बंधाऱ्यावर दरवाजे टाकून पाणी अडवणं, बंधाऱ्यात अडकलेला कचरा काढणं, शासनाचा पाणी कर वेळेवर भरणं, अशी कामं शेतकरी सामूहिकरीत्या करू लागले. बंधाऱ्याच्या व्यवस्थापनात सुधारणा झाल्या, त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला. दत्ता हामद हा बिटरगावातला तरुण. बंधाऱ्यापासून दीड कि.मी. अंतरावर त्याची १४ एकर शेती आहे. बंधाऱ्याच्या आधी त्याची फारच थोडी शेती ओलिताखाली यायची. तीही फक्त खरीप हंगामात. त्याला दुसऱ्याच्या शेतावर राबावं लागायचं. आता तो स्वतःचीच शेती करतोय. त्याने छान घर बांधलंय. मुलं शहरात शिक्षण घेत आहेत. त्याचा भाऊ पूर्वी दुसऱ्याच्या ट्रकवर चालक म्हणून काम करायचा. आता तो घरचा ट्रॅक्टर चालवतो. एक वेळ या कुटुंबाला रोजच्या जगण्याचा प्रश्न होता. आता त्यांचा चांगल्या प्रकारे उदरनिर्वाह होत आहे. बंधाऱ्यामुळे या भागातल्या बंजारा तांड्यामधल्या तरुणांचं होणारं



गांधीजींच्या आयुष्यातील अनेक अज्ञात गोष्टींचा खुलासा करणारं आगळं-वेगळं पुस्तक
अज्ञात गांधी
नारायणभाई देसाई
किंमत २०० रुपये
तीन महिन्यांत दुसरी आवृत्ती
समकालीन प्रकाशन
पुणे फोन : २४४७०८९६, २४४८६६३७.
मुंबई फोन : २४३११३९८.

स्थलांतर थांबलं. पूर्वी इथल्या जमिनींचे भाव आठ हजार रुपये एकर असताना कोणी विचारत नव्हतं. आज एकराला दोन लाख रुपये देऊन खरेदीची तयारी दाखवली तरी विकायला कुणी तयार होत नाही!

टाकळी बंधाऱ्याच्या परिसरातल्या शेतकऱ्यांना शासकीय अधिकाऱ्यांच्या, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे एकत्र येणं भाग पडलं, बंधाऱ्याचं व्यवस्थापन स्वत:च्या हातात घेणं भाग पडलं. शासनाच्या योजना चांगल्या असतात. शासन लोकांच्या हितासाठी चांगली कामं करतं; पण शासकीय यंत्रणेच्या ढिसाळपणामुळे, उदासीनतेमुळे अशा कामांचा-योजनांचा बोजवारा उडतो. सर्वसाधारणपणे चित्र असंच दिसतं. टाकळी बंधारा हे याचंच उदाहरण बनू पाहत होतं; पण गावकऱ्यांच्या एकीतून तसं घडलं नाही.

अर्थात साऱ्याच शासकीय यंत्रणेवर असा सरसकट शिक्का मारणं योग्य नाही. शासकीय यंत्रणेत असे अनेक कर्तबगार, कर्तव्यतत्पर लोक आहेत, जे आपल्या ज्ञानाचा, कल्पकतेचा आणि अधिकारांचा उपयोग लोकांच्या हितासाठी करत आहेत, विकासाच्या कामामध्ये आपलं योगदान देत आहेत, शासनाच्या योजना परिणामकारकपणे लोकांपर्यंत पोहोचवत आहेत. सातारा जिल्ह्यातल्या माण-खटाव तालुक्यांमधल्या निढळ व लोधवडे या गावांचा झालेला कायापालट ही याची ठळक उदाहरणं म्हणता येतील.

अवर्षणप्रवण क्षेत्रातल्या या गावांमध्ये इंडो-जर्मन पाणलोट क्षेत्र-विकास या शासनाच्या योजनेतून परिवर्तन घडलं आहे. कायमस्वरूपी दुष्काळी भाग असल्याने या गावांमध्ये पाण्याची कमतरता नेहमीचीच होती. निढळ या गावाची जमीन मुरमाड. ज्वारी-बाजरी हे मुख्य पीक. तेही पुरेसं पिकत नव्हतं. त्यामुळे इथे हंगामी स्थलांतर अटळ असायचं. २००३ च्या दुष्काळाचा मोठा फटका गावाला बसला. २००१ पासूनच गावाला पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची गरज भासू लागली. निढळ हे आवळी पठार डोंगराच्या पायथ्याशी असलेलं गाव. तिहे-खतपूर या योजनेचं पाणी या डोंगराच्या पाठीमागून गेलेलं. निढळपासून १६ कि.मी. अंतरावर तेर धरण; पण या धरणाचे कालवे निढळच्या विरुद्ध बाजूने काढण्यात आलेले. त्यामुळे या योजनांचा लाभ निढळला मिळत नव्हता. कोणत्याही योजनेतून निढळमध्ये पाणी लिफ्ट करून आणणं शक्य नव्हतं. त्यामुळे जलसंधारणाशिवाय पर्याय नाही, हे निढळवासीयांच्या लक्षात आलं.

इंडो-जर्मन पाणलोट क्षेत्रविकास ही योजना 'नाबार्ड'च्या माध्यमातून राबवली जाते. या योजनेमध्ये लोकसहभागाच्या तत्त्वाला प्राधान्य देण्यात आलं आहे. निढळ भागात ही योजना आणण्यात सध्या पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असलेल्या चंद्रकांत दळवी यांनी पुढाकार घेतला. निढळ हे त्यांचं गाव. गावाला पाणलोटाच्या कामाचं महत्त्व पटवून देण्याचं आणि प्रत्यक्ष काम करवून घेण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. निढळमध्ये २००५मध्ये ही योजना राबवण्यास सुरुवात झाली. लोकसहभाग व लोकवर्गणी हे ग्रामविकासाचं तत्त्व स्वीकारून गावात पाणलोट क्षेत्रविकास समिती स्थापन करण्यात आली. या योजनेअंतर्गत गावाच्या भौगोलिक स्थितीचा अभ्यास केल्यानंतर गावात एकूण ३० सिमेंट नालाबांध बांधले जाऊ शकतात, असं लक्षात आलं. त्यापैकी २४ बांध बांधून झाले आहेत, याशिवाय तीन पाझर तलाव बांधले आहेत. गावात २ हजार हेक्टर क्षेत्रावर 'नाबार्ड'ने जलसंधारणाची कामं केली आहेत. गावाभोवतीच्या डोंगरांवर सलग समतल चर खणून 'माथा ते पायथा' या सूत्राचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामुळे उघडे-बोडके पडलेले डोंगर हिरवेगार झाले आहेत. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली आहे. गावात २५० हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झाली आहे. ऊस-केळी अशी पिकं घेतली जाऊ लागली आहेत. पाण्याचा काटकसरीने उपयोग व्हावा यासाठी ठिबक सिंचनाद्वारे शेती करण्याचे प्रयोग चालू झाले आहेत. गावाचा दुधाचा व्यवसाय जोमाने सुरू झाला आहे. गावातल्या सुशिक्षित बेरोजगारांनी एकत्र येऊन सहकारी दुग्धसंस्था स्थापन केली आहे. गावात सामूहिक शेतीचे प्रयत्नही काही तरुण करत आहेत.

निढळप्रमाणेच लोधवडे गावाच्या पाणलोटविकास कार्यक्रमाला शासकीय अधिकाऱ्याची प्रेरणा मिळाली आहे. महाराष्ट्राचे कृषी आयुक्त प्रभाकर देशमुख यांचं हे गाव. १९९५ मध्ये आदर्श गाव योजनेत या गावाची निवड झाली त्यामागे प्रभाकर देशमुखांचीच प्रेरणा होती. २००३ च्या दुष्काळात पाण्याच्या समस्येवर मात कशी करता येईल, हा विचार गावात सुरू झाला. प्रभाकर देशमुख व त्यांच्या पत्नी अनुराधा देशमुख यांनी ग्रामस्थांना इंडो-जर्मन पाणलोटविकास कार्यक्रमाची माहिती दिली. गावकऱ्यांनी ग्रामसभा बोलवून ही योजना गावात राबवण्याचा निश्चय केला. इंडो-जर्मन पाणलोटविकासाबरोबरच 'हरियाली' व गतिमान पाणलोट क्षेत्रविकास या योजनाही गावात राबवण्यास सुरुवात झाली. लोक झपाट्याने कामाला लागले. श्रमदानातून पाणलोटाची कामं प्रत्यक्षात उतरू लागली. संपूर्ण गावाभोवती चर खोदण्यात आला. २८ नालाबांध व दोन पाझर तलाव बांधण्यात आले. गावाने २ लाख ३२ हजार वृक्षांची लागवड केली व त्यांची जोपासनासुद्धा. यामुळे लोधवडे परिसरातलं माळरान हिरवंगार होणार आहे. काल-परवापर्यंत पाण्याअभावी पडीक असलेली जमीन शेतकऱ्यांनी पुन्हा कसायला सुरुवात केली. शेतकऱ्यांना शेतीतून उत्पन्न मिळू लागलं. लोधवडे गावाचा असा कायापालट आता घडू लागला आहे.

◆

शासनाच्या योजना म्हणजे भ्रष्टाचाराची कुरणं, असा समज सर्वत्र पसरला आहे. खरं तर यात दोष योजनांचा नसतो, तर तो राबवणाऱ्यांचा असतो. शासनाच्या योजनांचा आधार घेऊन त्यांचा सुयोग्य पद्धतीने वापर केला तर परिणामकारक बदल घडू शकतात. त्यासाठी लोकांनी स्वयंस्फूर्तीने पुढे येण्याची गरज असते. याचं एक चांगलं उदाहरण म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्यातलं सारोळा मांडवा हे गाव. उस्मानाबाद जिल्ह्याच्या वाशी आणि कळंब तालुक्यांच्या सीमेवरचं हे गाव. या गावाला पाण्याचा मुख्य

स्रोत नाही. २००१ ते २००३ या काळातल्या दुष्काळानी हे गाव होरपळलं. तेव्हा पाण्यासाठी काही तरी उपाययोजना करणं आवश्यक आहे, हे गावकऱ्यांच्या लक्षात आलं. १९९४-९५ मध्ये या गावापासून सुमारे दीड किलोमीटर अंतरावर लघुपाटबंधारे खात्याने तलाव बांधला होता. या तलावामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला होता; पण नंतर सततच्या दुष्काळांमुळे पाण्याची पातळी खालावली. गावाला टँकरवर अवलंबून राहावं लागलं. शिवाय तलावाचा उपयोग केवळ अर्ध्या गावासाठीच होत होता. उरलेल्या भागातील शेतकऱ्यांची स्थिती 'जैसे थे' होती.

या गावाचं वैशिष्ट्य म्हणजे एरवी धार्मिक-सांस्कृतिक उपक्रमांसाठी एकत्र येणारं गाव पाण्याच्या प्रश्नावर मात्र एकत्र येत नव्हतं. इथले गावकरी स्वत:चा प्रश्न सोडवण्यासाठी वैयक्तिक पातळीवर पुढे सरसावले. आपापल्या शेतांची बांधबंदिस्ती करणं, शेतांमध्ये शेततळी खोदणं यासाठी वैयक्तिक स्तरावर इथले शेतकरी झटताना दिसतात. शासनाच्या प्रत्येक योजनेची माहिती मिळवणं, त्यासाठी जिल्हा परिषदेपासून कृषिखात्यापर्यंत विविध शासकीय अधिकाऱ्यांना भेटणं, त्यांचं सहकार्य घेणं यामध्ये हे शेतकरी आघाडीवर असल्याचं दिसतं. तालुका कृषी अधिकारी तानाजी चिमनशेट्टी यांच्या मते या गावातले लोक शेतीच्या बाबतीत अतिशय जागृत आहेत. जमिनीच्या पोताप्रमाणे कोणत्या पिकाची पेरणी करावी, कोणती खतं-कीटकनाशकं वापरावीत याची माहिती ते स्वत:हून घेतात. कृषी विभागामार्फत शेततळी घेण्याची योजना पुढे आल्यानंतर या गावातल्या अनेक शेतकऱ्यांनी प्रस्ताव दाखल केले. आज गावात ३२ शेततळी आहेत. सीताराम शिंदे यांची सहा एकर जमीन आणि इंदुबाई मोरे यांची आठ एकर जमीन. या दोघांनी मिळून एक शेततळं खोदलं. या पाण्यावर त्यांनी कापूस आणि तूर भिजवले. शेवटी पाणी कमी पडू लागल्यामुळे त्यांनी शेततळं आणखी तीन फूट खोदलं, तर या तळ्याला जिवंत पाणी लागलं! सखाराम मोरे यांनी आपल्या ३२ एकर शेतीत दोन शेततळी खोदली. त्यांनी शेताची पूर्ण बांधबंदिस्ती करून घेतली. यामुळे शेतातलं पाणी शेतात मुरलं. परिणामी, शेततळ्यांच्या पाण्याची पातळी वाढली.

शासनाच्या येणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ घ्यायचा, असा शेतकऱ्यांनी जणू विडाच उचलला आहे. शेतकऱ्यांच्या या जागृतीमुळे आणि स्वयंस्फूर्त पुढाकारामुळे शासकीय अधिकाऱ्यांना त्याची दखल घ्यावीच लागते व योजनेची अंमलबजावणी करावी लागते.

◆

सारोळा मांडवीप्रमाणेच धुळे जिल्ह्यातल्या बारीपाडा या वनक्षेत्रातल्या गावाचंही उदाहरण बोलकं आहे. चैतराम पवार या पदवीधर तरुणाच्या प्रयत्नांमधून या गावाचा पाणीप्रश्न सुटला आहे. त्यांना वनवासी कल्याण आश्रमाच्या डॉ. आनंद फाटक यांचीही साथ मिळाली.

या परिसरातील जंगल संपण्याच्या मार्गावर होतं, म्हणून चैतरामने पहिला कार्यक्रम हाती घेतला. तो म्हणजे अकराशे झाडं लावण्याचा. त्याला गावकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. नव्याने लावलेल्या झाडांची व जंगलातील आधीच्याच झाडांच्या संवर्धनाची व संरक्षणाची जबाबदारी गावाने घेतली. या झाडांना पाणी मिळावं यासाठी गावकऱ्यांनी छोटे छोटे दगडी बांध घालायला सुरुवात केली. असे ३४० दगडी बांध श्रमदानातून बांधले. वनविभागाकडूनही ५० दगडी बांधांचं तसंच ५० हेक्टर क्षेत्रावर सलग समतल चराचं काम करण्यात आलं. यामुळे झाडांना तर भरपूर पाणी मिळालंच, शिवाय गावकऱ्यांच्याही पाण्याचा प्रश्न सुटला. ३ ते ७ एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचं सरासरी उत्पन्न ५० हजार रुपयांपर्यंत, तर १० एकर शेती असणाऱ्या शेतकऱ्यांचं एक लाख रुपयांपर्यंत वाढलं. गावातल्या विहिरीची संख्या सहावरून ४०वर पोहोचली. भूजल पातळी वाढली. ज्या बारीपाड्यासाठी मांजरी गावावरून पाणी आणावं लागत होतं तो बारीपाडा आज मधुकुणीपाडा, मांजरी, नवापाडा, गोट्याचा पाडा व मोगरपाडा अशा पाच गावांना पाणी पुरवतो.

◆

अलीकडच्या काळात स्वयंसेवी-सेवाभावी संस्थादेखील टीकेचं लक्ष्य झाल्या आहेत. बऱ्याचशा संस्था केवळ उंटावरून शेळ्या हाकतात, असं त्यांचे टीकाकार म्हणतात. स्वयंसेवी संस्था जेवढा


**महाअनुभव**

दि रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर्स (सेंट्रल) रुल्स १९५६ नियम क्र. ८ अन्वये 'महा अनुभव' या मासिकाची मालकी व इतर तपशिलांसंबंधी निवेदन

**१) प्रकाशन स्थळ :**
८ अमित कॉम्प्लेक्स, ४७४
सदाशिव पेठ, पुणे -४११०३०

**२) प्रकाशनाचा प्रसिद्धी काळ :**
मासिक

**३) मुद्रक व प्रकाशक :**
**आनंद म. अवधानी**
८ अमित कॉम्प्लेक्स, ४७४
सदाशिव पेठ, पुणे -४१११०३०

**४) संपादक :**
• **सुहास कुलकर्णी**
फ्लॅट नंबर १०, गिरीजाशंकर
विहार, कर्वेनगर, पुणे-४११०५२
• **आनंद अवधानी**
२,हर्षदा सोसायटी, रामबाग
कॉलनी, पौड रोड, पुणे-४११०३८

**५) संचालक :**
• **व्यवस्थापकीय संचालक :**
**आनंद अवधानी**
२ हर्षदा सोसायटी, रामबाग
कॉलनी, पौड रोड, पुणे-४११०३८
• **संचालक : सुहास कुलकर्णी**
फ्लॅट नंबर १०, गिरीजाशंकर
विहार, कर्वेनगर, पुणे-४११०५२

मासिकाची मालकी ज्यांच्याकडे आहे, अशा व्यक्ती व एकूण भांडवलात एक टक्क्याहून अधिक भाग धारण करणारे भागधारक, त्यांची नावे व पत्ते :

**युनिक फीचर्स अँड न्यूज प्रा. लि.**
८ अमित कॉम्प्लेक्स, ४७४
सदाशिव पेठ, पुणे -४१११०३०

**६) भागधारक**
• **आनंद अवधानी**
२ हर्षदा सोसायटी,
रामबाग कॉलनी, पौड रोड,
पुणे - ४११०३८
• **सुहास कुलकर्णी**
फ्लॅट नंबर १०, गिरीजाशंकर
विहार, कर्वेनगर, पुणे-४११०५२

गाजावाजा करतात तेवढं त्याचं काम कुठे दिसत नाही, अशी त्यांच्याविषयी नाराजीदेखील व्यक्त केली जाते. पण ही टीका सरसकट साऱ्याच संस्थांना लागू होत नाही. सगळेचजण 'एकाच माळेची मणी' नसतात. अनेक सेवाभावी संस्था 'ग्रामविकास' हे एक 'मिशन' मानून गावा-गावांमधून जाणीवजागृती करीत आहेत, लोकांना बरोबर घेऊन गावागावांमध्ये परिवर्तन घडवत आहेत. वर्ध्याची चेतना विकास संस्था ही अशा संस्थांपैकी एक आहे. गांधीविचाराने प्रेरित झालेल्या अशोक बंग यांनी या संस्थेची स्थापना केली आहे. पाणी, माती, झाडझाडोरा अशा नैसर्गिक संसाधनांचं जतन-संवर्धन, स्वावलंबी व स्वयंपूर्ण शेती आणि महिला सक्षमीकरण, या तीन गोष्टींमध्ये ही संस्था भरीव कार्य करत आहे. शेतकऱ्यांना शेतीच्या विकासासाठी पाणलोटाचं महत्त्व कळावं, तसंच पाणलोटाच्या कामांसाठी कुणावर अवलंबून राहावं लागू नये यासाठी चेतना विकासतर्फे गावकऱ्यांना प्रशिक्षण दिलं जातं. पाणलोटाची कामं करण्यासाठी शेतकऱ्यांना तांत्रिक ज्ञान मिळावं या उद्देशाने ही संस्था 'गाव इंजिनियर' ही संकल्पना राबवत आहे. यामध्ये ज्या व्यक्तीला थोडीफार आकडेमोड करता येते तिला पाणलोटाच्या कामांचं प्रशिक्षण दिलं जातं. अशा व्यक्तीचं नाव गावकरीच संस्थेला सुचवतात. त्यामध्ये पुरुषांबरोबरच महिलांनाही सहभागी करून घेतलं जातं. 'चेतना विकास'ने विकसित केलेलं 'पाणीपातळी यंत्र' हाताळणं, ते बनवणं व त्याचा प्रत्यक्ष वापर करणं, यंत्राच्या साहाय्याने जमिनीच्या उताराची टक्केवारी काढणं, त्यानुसार बांध घालणं, अशा बाबींचा प्रशिक्षणात अंतर्भाव केला जातो. हे प्रशिक्षण पाच दिवसांचं असतं. 'चेतना विकास'ने प्रशिक्षित केलेले 'गाव इंजिनियर' आता गावागावांमध्ये कार्यरत आहेत.

वर्धा जिल्ह्यातल्या खापरी या गावाने चेतना विकासच्या सहकार्याने बदल घडवून आणला आहे. या गावात सुरुवातीला 'चेतना विकास'ने बांध घालून पाणी अडवणं, सलग समतल चर खोदणं, उभ्या पिकाला आडवी पेरणी करणं, अशा छोट्या छोट्या उपाययोजना सुरू केल्या. गावाच्या वरच्या बाजूला तलाव खोदला तर पाण्याची समस्या सुटण्यास मदत होईल, ही कल्पना 'चेतना विकास'ने गावकऱ्यांसमोर मांडली. गावकऱ्यांना ती पटली. स्मशानभूमीच्या बाजूला वनविभागाची पडीक जमीन होती. या जमिनीवर तलाव बांधण्यासाठी गावकऱ्यांनी वनविभागाकडे अर्ज केले, पण त्याला प्रतिसाद मिळेना. वनविभागाकडून परवानगी मिळवण्यासाठी सारं गाव एक झालं. वरिष्ठ अधिकारी गावकऱ्यांची मागणी मान्य करण्यास तयार नव्हते.

या जमिनीच्या काही भागावर तलाव झाल्यास उर्वरित भागात झाडं लावता येतील; वन्य प्राण्यांचा, गुरांचा व गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल, हे गावकऱ्यांनी त्यांना पटवून दिलं. अखेर एक वर्षानंतर या तलावाच्या बांधकामास परवानगी मिळाली. तलावाच्या बांधकामासाठी गावकऱ्यांनी लोकवर्गणी गोळा केली, श्रमदान केलं. एक वर्षात तलाव पूर्ण झाला. तो भरल्यानंतर गावाचा पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा प्रश्न सुटला. तलाव होण्यापूर्वी गावात फक्त तीन विहिरी होत्या. आता हा आकडा पन्नासवर गेला आहे. या गावात पाण्याचं इतकं प्रमाण पाहून गावात आलेले लोक आश्चर्य व्यक्त करतात. या गावात केशवराव डंभारे व ताई डंभारे 'गाव इंजिनियर' म्हणून काम पाहतात. या गावातल्या चारशे एकर शेतीत त्यांनी जलसंधारणाची कामं केली आहेत. एका सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने सामूहिक प्रयत्नांतून या गावाने पाण्याचा प्रश्न सोडवला आहे.

◆

लोकशक्ती एकवटली तर प्रश्नांवर मात करता येते, हे खरं असलं, तरी गावातल्या लोकांना एकत्र आणणं हे खरोखरच अवघड काम. पाण्याच्या टंचाईसारखे प्रश्न सर्वांनाच भेडसावत असले, तरी प्रत्येकाच्या गरजा वेगळ्या, धारणा वेगळ्या. जुनी भांडणं, हेवेदावे, समज-गैरसमज असे असंख्य अडथळे. या पार्श्वभूमीवर लोकांना एकत्र करण्यासाठी श्रद्धेचा मार्ग अवलंबण्याची उदाहरणं ठिकठिकाणी आढळतात. भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह अशा धार्मिक कार्यक्रमांमधून लोक एकत्र येऊ शकतात. देवाच्या कामाला लोक नाही म्हणत नाहीत. त्यामुळे मंदिर बांधणं, मंदिराची डागडुजी करणं यासाठी लोकांची मदत मिळते, त्यांचा सहभाग मिळतो. धार्मिक कार्यक्रमाच्या निमित्ताने लोक एकत्र आले व त्यातून ग्रामविकासाच्या योजनांना चालना मिळाली, अशी अनेक उदाहरणं सांगता येतील.

याच अनुषंगाने सातारा जिल्ह्यातल्या पुसेगाव देवस्थानाने केलेल्या जलसंधारणाच्या कामाची दखल घ्यायला हवी. शंभर वर्षांपूर्वी पुसेगावात सेवागिरी महाराजांचं वास्तव्य होतं. दु:खितांची-


खास सुट्ट्यांमधील आकर्षक सहली

Leisure moments....
Pranav
Tours & travels

- काश्मीर–वैष्णोदेवी
- सिमला–मनाली
- लेह–लडाख
- नैनिताल–रानीखेत
- उटी–कोडाईकॅनाल
- दार्जिलिंग–सिक्कीम
- मुन्नार–अलेप्पी
- डलहौसी–खज्जीयाल

याशिवाय बरेच पर्याय !

आजच या आणि आपली सहल निश्चित करा.

❑ इंडिका, क्वॉलिस भाड्याने मिळेल. ❑ ❑ पासपोर्ट/फॉरेन एक्स्चेंज असिस्टन्स्. ❑

२९, गणेशदत्त हौसिंग सोसायटी, सहकारनगर नं.१, पुणे – ४११ ००९. मोबाईल : ९८२२२ ८३२३३

कष्टकऱ्यांची सेवा करणं, त्यांच्या मदतीसाठी धावून जाणं ही त्यांची वृत्ती. त्यांच्या कर्तृत्वामुळे व आध्यात्मिक सामर्थ्यामुळे पुसेगाव नावारूपाला आलं. आता पुसेगावात सेवागिरी महाराज देवस्थान ट्रस्ट आहे. २००३च्या दुष्काळात पुसेगावात पाण्याचं दुर्भिक्ष निर्माण झालं. लोकांनी रोजंदारीसाठी स्थलांतर केलं. गुरांना गुरांच्या छावण्यांमध्ये सोडण्यात आलं. गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू झाला. याची झळ पुसेगावात दरवर्षी सेवागिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या यात्रेलाही बसली, तेव्हाच गावाचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी काही तरी केलं पाहिजे, हे देवस्थानाने मनावर घेतलं.

तत्कालीन मठाधिपती आत्माराम गिरी महाराज त्यांच्या गावाकडे जात असताना पुसेगावच्या हद्दीतील विसापूरजवळचा तलाव त्यांना दिसला. हा तलाव पूर्ण कोरडा होता. पूर्वीचा पाण्याने भरलेला तलाव त्यांना आठवला. या परिसरातल्या लोकांना, शेतकऱ्यांना, पशु-पक्ष्यांना या तलावाचा मोठा आधार होता. या तलावाची भिंत फुटली होती, त्यामुळे त्यातलं पाणी वाहून जात होतं. हे लक्षात आल्यानंतर आत्माराम गिरी महाराजांनी या तलावाची दुरुस्ती करण्याचं मनावर घेतलं. देवस्थानने तलावाच्या दुरुस्तीचं काम हाती घेतल्यानंतर परिसरातले शेतकरी उस्त्फूर्तपणे पुढे आले. काहीजणांनी आर्थिक मदत केली, तर काहीजणांनी श्रमदान केलं. या तलावापाठोपाठ देवस्थानने वेरणे हद्दीतल्या करंजाले तलावातला गाळ काढण्याचं काम हाती घेतलं. याशिवाय करगुण हद्दीतील तेलओढ्यावर नाला बंडिंग, तसंच रामोशी वस्तीजवळच्या तलावातला गाळ काढण्यासाठी सुरुवात केली. तलावांमधला गाळ काढल्यानंतर देवस्थानने नालाबांध बांधण्यास सुरुवात केली. त्यात सिमेंटचे २७ बांध, मातीचे १२५ बांध बांधले, ३ ग्रामतळी, ३ विहिरी बोअर पुनर्भरण, अशी कामं पूर्ण केली. देवस्थानच्या या कामात लोकांनी सक्रिय सहभाग घेतला. देवस्थानचं काम हे आपलंच काम, असं मानून लोकांनी आर्थिक भार उचलण्यापासून श्रमांचं योगदान दिलं.

पुसेगावसारखी महाराष्ट्रात अनेक देवस्थानं आहेत. लोकांची त्यावर श्रद्धा आहे. या देवस्थानांनी पुसेगावचं अनुकरण केलं तर अनेक भागांतलं पाण्याचं दुर्भिक्ष नाहीसं होऊ शकेल.

◆

'केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे' ही उक्ती सार्थ करणारी ही उदाहरणं आहेत. लोकांचा आपल्या प्रयत्नांवर विश्वास असेल तर विपरीत परिस्थितीवर मात करण्याचे मार्ग सापडतात. सुदैवाने महाराष्ट्रात पाण्याच्या प्रश्नावर बराच अभ्यास झाला आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांची भौगोलिक स्थिती, हवामान आणि त्याला अनुसरून पाण्याच्या टंचाईवर कशा प्रकारे मात करता येऊ शकते, या संदर्भात तज्ज्ञमंडळी सातत्याने लिहीत आहेत, पाणलोट क्षेत्रविकास आणि जलसंधारणाचं महत्त्व पटवून देत आहेत. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत अनेकांनी जलसंधारणाचे यशस्वी प्रयोग केले आहेत. १९७२च्या दुष्काळानंतर राज्य शासनानेही जलसंधारण व पाणलोट क्षेत्रविकासाला चालना दिली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या योजना आणल्या आहेत. पाण्याचं नियोजन आणि व्यवस्थापनामध्ये लोकसहभागाला चालना देण्यात येत आहे. ही परिस्थिती अनुकूल मानून यातून महाराष्ट्रातल्या गावागावांनी, वाड्या-वस्त्यांनी पाण्याचा प्रश्न सोडवण्याची प्रेरणा घ्यायला हवी.

आपल्या विपरीत परिस्थितीकरता आपल्या नशिबाला दोष देण्याची वृत्ती लोकांमध्ये बऱ्याच प्रमाणात दिसून येते. सरकारनेच सारं काही केलं पाहिजे, ही धारणाही बऱ्याच प्रमाणात आहे. आपल्या दुरवस्थेसाठी सरकारला, शासकीय अधिकाऱ्यांना दोष देणं, सरसकट सारी यंत्रणाच सडली आहे असं मानणं, हे पलायनवादाचं लक्षण आहे. प्रबळ लोकइच्छा असेल तर शासनयंत्रणा, सेवाभावी संस्था सहकार्यासाठी पुढे येतात. शासकीय यंत्रणेतले कार्यक्षम, कर्तव्यतत्पर अधिकारी लोकांना प्रेरित करतात, त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतःला झोकून देतात, हीदेखील वस्तुस्थिती आहे. तिचा स्वीकार केल्यास प्रश्न मार्गी लागू शकतात.


पाणी मिळालं की परिस्थिती बदलते, शेतीचं उत्पादन वाढतं, प्रगतीला चालना मिळते, गावं विकास पावू लागतात, पाण्याच्या प्रत्येक थेंबातून समृद्धी साकारते, हे या गावांनी दाखवून दिलं आहे. म्हणूनच त्यांचं काम पथदर्शक ठरतं. आपण निसर्गाच्या हवाल्यावर जगायचं की आपल्या समृद्धीचा मार्ग आपणच ठरवायचा, याची निवड करणं आपल्याच हातात आहे.

◆

**मनोहर सोनवणे**
मोबाइल : ९७६३३५८८९५

**संतोष गवळे**
मोबाइल : ९७६७२१९०७३

(या लेखातील माहिती मिळवण्यासाठी खालील व्यक्तींचं सहकार्य मिळालं : सुदाम नवसे, सुपे; अशोक बंग, वारलुजी मिलमिले, जानराव गोमासे, वर्धा; केशवराव डंभारे, ताई डंभारे, खापरी (वर्धा); नितीन काळेल, मोहन मस्करपाटील, सातारा; संतोष साळुंखे, शामराव जाधव, पुसेगाव; राजकुमार पन्हाळे, साहेबराव खुस्पे, अशोक खुस्पे, निढळ; अनुराधा प्रभाकर देशमुख, दिलीप चव्हाण (सरपंच), लोधवडे; तानाजी चिमनशेट्टी, वाशी (तालुका कृषी अधिकारी), रामभाऊ मोरे, संदीप आडसुळ, सारोळा मांडवी; राधाकृष्ण मुळी (जिल्हा माहिती अधिकारी), उस्मानाबाद; संतोष पुरी, ढाणकी; प्रकाश पेंधे, बिटरगाव बु.; बालाजी आंबेपवार, टाकळी, हिमायतनगर)



आपला भवताल सुंदर करू पाहणाऱ्या आणि त्यासाठी आवाहन करणाऱ्या नामवंतांच्या गाजलेल्या भाषणांचा संग्रह
किंमत २०० रु.
कर के देखो
संपादक : सदा डुम्बरे
तिसरी आवृत्ती
समकालीन प्रकाशन
पुणे फोन : २४४७०८९६, २४४८६६३७.
मुंबई फोन : २४३११३९८.